**MHKO100014642023**

## <u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>

अर्जदार हिने सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जाचे व त्यावरील दाखल म्हणण्याचे अवलोकन केले.

३. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित होत असून खालील कारणमीमांसेआधारे मी त्यांचे निष्कर्ष त्यांच्या पुढे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी अर्जामध्ये वि.प. यांनी अर्जदार विरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले हे दिसुन येते का ? | होय. |
| २. | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? | होय. |
| ३. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

४. अर्जदार यांनी निशाणी ६ वर आपल्या उत्पन्न, जमा व खर्चाचे विवरणाबाबत शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदारने आपले शपथपत्रात तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही असे कथन केले आहे. वि.प.क्र.१ यांनी निशाणी १७ वर प्रस्तुत अर्जास आपले म्हणणे सादर केले आहे. अर्जदारतर्फे कागदोपत्री पुरावा म्हणून निशाणी ३ वर दाखल केला आहे. वि.प.यांनी नि.१० वर आपल्या उत्पन्न, जमा व खर्चाचे विवरणाबाबत शपथपत्र दाखल केले आहे. वि.प. यांनी आपले शपथपत्रात त्याला दरमहा रू.३०,०००/- पगार असल्याचे कथन केले आहे.

**मुद्दा क्र.१ करीता -**

५. अर्जदारचा अंतरिम पोटगी मिळण्यासाठीचा अर्ज आणि त्यावरील वि.प. यांनी दिलेल्या म्हणण्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार व वि.प. क्र.१ हे पती-पत्नी असुन त्यांचे आजरोजी नातेसंबंध कायम आहे. अर्जदारतर्फे विधीज्ञ यांचे युक्तीवादावरुन व अर्जातील कथनावरुन हे स्पष्ट होते की, अर्जदार आणि वि.प. यांनी परस्परविरोधी कथने केलेली आहेत. आज रोजी अर्जदार वि.प.क्र.१ यांचेपासुन विभक्त राहत आहे व वि.प. यांनी अर्जदारवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सांगितले आहे. म्हणुन प्रथमदर्शनी अर्जदार ही महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायद्यानुसार पिडीत व्यक्ती असल्याचे दिसुन येते.

६. अर्जदारतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदारला मुल होत नाही म्हणून वि.प.यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे. अर्जदारने वि.प. विरूध्द केलेले आरोप शपथेवर केले आहेत. अर्ज निकाली निघण्यास बराच कालावधी लागणार आहे. पुराव्यादरम्यान वि.प.विरूध्द केलेले आरोप सिद्ध होतील. दरम्यानचे काळात अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने अंतरिम पोटगीची गरज आहे. वि.प. हा बी.ई मेकॅनिकल असून सन २०२३ पुर्वी त्याला दरमहा रूपये ७०,०००/- पगार होता. वि.प. यांनी त्याला दरमहा रू.३०,०००/- पगार असल्याचे त्यांच्या संपत्ती व दायित्व शपथपत्रात खोटे नमूद केले आहे. तरी अर्जदारास अंतरिम पोटगी मंजूर करावी.

७. वि.प.तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वि.प. यांनी अर्जदारचे उपचाराकरीता सहा लाख रूपये खर्च केला आहे. त्यासाठी वि.प. अर्जदारला त्रास देत असते तर वि.प. यांनी तिच्या उपचारासाठी खर्च केला नसता. संरक्षण अधिकारी यांनी घरगुती हिंसाचार अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही, त्यामुळे अर्जदारवर कोणताही घरगुती हिंसाचार झाला नाही. त्यामुळे सदर केस चालण्यास पात्र नाही. तसेच अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र नाही. त्यांच्या युक्तीवादीचे समर्थनार्थ त्यांनी खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

१. *देवानंद बलीराम वानखेडे आणि इतर वि. महाराष्ट्र सरकार, २०१५ ऑल*

*एम.आर(क्री) ३६१८,* सदर न्यायनिर्णय हा वि.प.यांनी त्यांच्याविरूध्द दाखल केस रद्द होण्याकरीता केलेल्या अर्जाशी निगडीत आहे. त्यानुसार वि.प.यांच्याविरूध्द कोणतेही आरोप अर्जदारने केलेले नसल्याने त्यांच्याविरूध्दची केस रद्द करण्यात आली होती.

परंतु माझ्या हातातील प्रकरणात अर्जदारने वि.प. यांच्याविरूध्द सविस्तर आरोप केले आहेत. तसेच सदर प्रकरण हे सध्या अंतरिम अर्ज निर्णीत करण्याच्या स्टेजला आहे. म्हणून मी आदरपुर्वक नमुद करू इच्छीते की, दोन्ही प्रकरणातील वस्तुस्थिती वेगळी असल्याने सदर न्यायनिर्णय या प्रकरणास लागू होत नाही.

२. रजनीश वि. नेहा आणि इतर, क्रिमीनल अपिल क्र. ७३०/२०२० मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्देशीत केल्याप्रमाणे संपती व उत्तरदायित्वाबाबतचे शपथपत्रात नमूद केल्याप्रमाणे अर्जदार व वि.प. यांनी दिलेली माहिती सदर अर्ज निकाली काढताना विचारात घेतली आहे.

८. अंतरिम पोटगीच्या अर्जाच्या वेळी अर्जदाराने केलेले कथन सिध्द करणे अपेक्षित नाही. तसेच, वि.प. यांनी सुध्दा त्यांचेविरुध्द किंवा त्यांनी केलेले कथन सिध्द करणे अपेक्षित नाही. यावेळी केवळ अर्जदाराने केलेल्या अर्जामध्ये महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायद्याचे तरतुदींप्रमाणे प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार दिसुन येतो काय हे पाहणे महत्वाचे आहे. अर्जामधील वि.प. यांचे विरुध्द केलेल्या आरोपाबाबत अर्जदारने अर्जासोबत त्यांचे शपथपत्र दाखल केले आहे.

९. अर्जदार यांनी अर्जामध्ये वि.प.यांनी अर्जदारला कमी लेखून अपमानास्पद वागणूक देणे, बाळ होत नाही म्हणून टोमणे मारणे, अपमानास्पद बोलणे अशाप्रकारे वि.प. यांनी अर्जदार यांना वेळोवेळी मानसिक व शारीरिक त्रास दिलेला आहे असे कथन केले आहे. वि.प.यांनी देखील आपले म्हणणेमध्ये अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. वि.प. यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार हीने त्यांना मानसिक त्रास दिला आहे. अर्जदार ही त्यांचा त्याग करून

स्वत:हून माहेरी राहत आहेत. अशाप्रकारे अर्जदार व वि.प. यांनी एकमेकांविरूध्द बरेच आरोप केले असून निश्चितच त्यावर दोन्ही पक्षांचा साक्षपुरावा झाल्यानंतरच निर्णय देता येईल. या क्षणी केवळ हे पाहणे गरजेचे आहे की, अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते किंवा नाही. अर्जदार ही सध्या वि.प. यांचेपासून विभक्त राहत आहे. अर्जदार हिचा त्याग केलेपासून अर्जदारच्या कोणत्याही प्रकारची पोटापाण्याची,कपडेलत्त्याची, औषधपाण्याची कोणतीही सोय वि.प.क्र.१ यांनी केलेली नाही. वर नमूद सर्व घटनांवरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वि.प. यांनी अर्जदार यांचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीता -**

१०. सध्या अर्जदार ही वि.प.क्र.१ यांचेसोबत राहत नाही. प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर चालून अंतिम निकाल होणेकरीता कालावधी लागणार आहे. त्यामुळे, अंतरिम पोटगी अर्जाचे कामी दोन्ही बाजुंतर्फे दाखल कागदपत्रे, शपथपत्रे व कथनांवरुन असे दिसुन येते की, अर्जदार ही वि.प.क्र.१ याचेपासुन वेगळे राहत असल्यापासुन वि.प.क्र.१ यांनी अर्जदारचा पती या नात्याने तिच्या पालन पोषणाची व उदरनिर्वाहाची त्यांची नैतीक जबाबदारी असताना ती पार पाडलेली नाही. म्हणून, अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

११. अभिलेखावर दाखल कागदपत्रांवरुन असे दिसुन येते की, अर्जदाराने उत्पन्न व दायित्वाचे शपथपत्रात वि.प.क्र.१ हा खोपोली येथे नोकरीस असून त्याला दरमहा रू.७०,०००/- इतका पगार मिळतो असे नमूद केले आहे. तसेच, वि.प. क्र.१ यांचेवर अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणीही अवलंबुन नसल्याचे कथन केले आहे. अर्जदार यांनी वि.प.क्र.१ खोपोली येथे नोकरी करत असून त्याला दरमहा रू. ७०,०००/- पगार मिळत असल्याचे दर्शविण्यासाठी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, केवळ अर्जदाराने तिच्या शपथपत्रामध्ये नमुद केले म्हणुन वि.प. यांना उत्पन्न आहे असे समजता येणार नाही.

१२. वि.प. यांनी निशाणी १४ वरील उत्पन्न व दायित्वाचे शपथपत्रात तो सुपरवायझर म्हणून नोकरीस असून त्याला दरमहा रू. ३०,०००/- पगार मिळत असल्याचे नमूद केले आहे. वि.प. यांनी आपले म्हणणेत अर्जदार एल.आय.सी. एंजट म्हणून काम करत असून तिला दरमहा रू.१०,०००/- पगार मिळतो. परंतु त्याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार हिने ती स्वत:चा चरितार्थ चालवण्यास असमर्थ असल्याचे कथन केले आहे. अशा परिस्थितीत पती या नात्याने अर्जदारच्या उदरनिर्वाहाची तसेच कपडे लत्ते, औषधोपचार इत्यादीची व्यवस्था करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी वि.प.क्र.१ यांची आहे.

१३. अंतरिम पोटगी मंजुर करताना न्यायालयाने अर्जदाराच्या जीवनावश्यक गरजा तसेच दोन्ही पक्षकारांचा राहणीमानाचा दर्जाचा विचार करुन अर्जदाराला किती पोटगी देणे न्यायोचित राहील हे ठरविणे महत्वाचे आहे. त्यामुळे अर्जदार हिला अंतरिम पोटगी म्हणुन रक्कम रुपये ३,०००/- देणे न्यायोचित होईल. म्हणून, मी मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी दिलेले आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीता</u>** -

१४. वर नमुद सर्व स्पष्टीकरण व मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष लक्षात घेता अर्ज अंशतः मंजुर होणेस पात्र आहे. वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांचेकडे दुर्लक्ष केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्यामुळे अर्जदाराला प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन अंतरिम पोटगी देणे न्यायोचित होईल. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास येणा-या खर्चाचा विचार मुख्य अर्ज निकाली काढताना विचारात घेता येईल. सबब, मी मुद्दा क्र.३ करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२ वि.प. यांनी अर्ज दाखल तारखेपासुन या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अर्जदारला अंतरिम पोटगी म्हणुन रक्कम रुपये ३,०००/- (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) द्यावी.

३ अर्जदार यांनी आपला पुरावा पुढील तारखेस सुरु करावा.

४ प्रस्तुत आदेशाची प्रत दोन्ही बाजुंना मोफत देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV
PAWAR
Date: 2025.11.20
11:52:44 +0530

ठिकाण गडहिंग्लज
दिनांकः- १९/११/२०२५.

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट क्र.२), गडहिंग्लज